जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर
P.R.O. Office, Crime Branch, Pune City Ph.020 / 26122478
Adress - POLICE COMMISSIONER OFFICE,Pune City.
NEAR G.P.O.SADHU VASWANI ROAD,
PUNE MAHARASHTRA - 411001
E-Mail ID : crimepress.pune@gov.in

प्रेसनोट क्र. २९६६ दि. ०९/०९/२०१९

## विश्रामबाग पोलीस स्टेशन,पुणे शहर.

## विश्रामबाग पोलीस ठाण्याच्या हद्दीत पर्स चोरी करणारी महीला आरोपी दामिनी मार्शल कडुन जेरबंद.

तक्रारदार महीला नामे सारीका अरुण मोरे, वय-२८ वर्षे, राहणार-हॅपी कॉलनी, गोसावी वस्ती, कोथरुड,पुणे या त्यांची आई श्रीमती मंगल राजाभाऊ ढवळे, व बहीण करीष्मा आनंद सोनावणे यांचेसह दिनांक-१९/०८/२०१९ रोजी १२-०० ते ०१-०० वाजताचे सुमारांस श्रीमंत दगडुशेठ गणपतीचे दर्शनासाठी येवुन सदरवेळी त्या मंदीराचे रांगेमध्ये उभ्या असतांना कोणीतरी अज्ञात चोरटयाने त्यांचे खांद्याला अडकविलेली पिशवी कापुन त्यांतील छोटी पर्स व ६,४००/-रुपये रोख रक्कमेसह चोरुन नेलेबाबत सारीका अरुण मोर यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार दिनांक-१९/०८/२०१९ रोजी दुपारी १५-१२ वाजता विश्रामबाग पोलीस ठाणे,पुणेशहर,गु.र.नं. ३००/२०१९, भा.दं.वि.सं.कलम ३७९ प्रमाणे गुन्हा दाखल झालेला होता.

मा. स्वप्ना गोरे मॅडम, पोलीस उप आयुक्त सो.परिमंडळ-१, पुणेशहर, तसेच मा. सुधाकर यादव, सहाय्यक पोलीस आयुक्त सो.विश्रामबाग विभाग, पुणेशहर, यांचे मार्गदर्शनाप्रमाणे व वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. दादासाहेब चुडाप्पा, यांचे अधिपत्याखाली कर्तव्यावरील खडक-समर्थ पोलीस ठाण्याच्या महीला पोलीस मार्शल म.पो.शि. आत्राम, म.पो.शि. मुंढे, व डेक्कन-शिवाजीनगर पोलीस ठाण्याकडील महीला पोलीस मार्शल म.पो.शि. वालेकर, म.पो.शि. शेख असे तुळशीबाग-मुंडई परिसरांत पेट्रोलींग फिरत असतांना त्यांना एक महीला संशयास्पद रित्या वावरतांना दिसली. सदर महीलेला तात्काळ वरनमुद महीला पोलीस मार्शल यांनी ताब्यांत घेवुन तिचे नांव पत्ता विचारता तिने आपले नांव-आसमाँ मुजाहेद सैय्यदा,वय-३३ वर्षे, राहणार-१२७-३, धनगरवाडा, ता.पैठण, जिल्हा-औरंगाबाद असे असल्याचे सांगितले. सदरवेळी तिचेकडे विचारपुस केली असता ती पर्स चोरी करुन आपला उदरनिर्वाह करीत असल्याचे तिने कबुल केले. सदरवेळी तिचे कब्जात ५,९००/-रुपये रोख रक्कम, एक सॅमसंग कंपनीचा मोबाईल हॅण्डसेट व एक छोटे लोखंडी कटर

असा माल मिळुन आला. तिचेकडे अधिक विचारपुस करता तिने वरील गुन्हा केल्याचे कबुल केल्याने वरनमुद महीला आसमाँ मुजाहेद सैय्यदा,वय-३३ वर्षे, राहणार-१२७-३, धनगरवाडा, ता.पैठण, जिल्हा-औरंगाबाद हीला दिनांक-०३/०९/२०१९ रोजी ००-४५ वाजता अटक करुन तिचेकडुन सदर गुन्हयातील चोरीस गेलेली रोख रक्कम हस्तगत करुन सदरचा पर्स चोरीचा गुन्हा उघडकींस आणलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. दादासाहेब चुडाप्पा यांचे मार्गदर्शनाखाली महीला पोलीस हवालदार माधुरी महामुनी या करीत आहेत.

(दादासाहेब चुडाप्पा )
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
विश्रामबाग पोलीस ठाणे,पुणे शहर.